## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र :पोमसं/८अ/उश्रेलले ते स्वीय सहायक/मुफसल/निवडसुची/२०२२-२३/१५८/२०२२ दिनांक: १९/०१/२०२३

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद उच्चश्रेणी लघुलेखक यांना स्वीय सहायक (राजपत्रित गट-ब) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र | उच्चश्रेणी लघुलेखकाचे नाव | सध्याचे नियुक्तीचे कार्यालय | पदस्थापनेवरील कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती पुजा हेमंत महाजन | पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे |

२. उपरोक्त पदोन्नतीची पदस्थापना सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

**रजनिश सेठ**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् / १०८२/ सीआर् /११००(२) /अेसईआर्-३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.से. (वेतन) नियम, ११ (१) (अ) अन्वये केली जाईल याची संबंधीत अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

२. उपरोक्त उच्चश्रेणी लघुलेखक यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा निवडसूची वर्ष २०२२-२३ मध्ये संपुष्टात येत नसेल तर त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त न करता सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवून पुढील आदेशांची वाट पाहावी.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी वर नमूद उच्चश्रेणी लघुलेखक यांचेविरुध्द उपरोक्त काहीच प्रलंबित नसेल तर, पदोन्नतीवर, उच्चश्रेणी लघुलेखकाची वाट न पाहता, नियुक्तीच्या ठिकाणी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे आणि त्याप्रमाणे ह्या कार्यालयास कळवावे.

४. ज्या उच्चश्रेणी लघुलेखकांना पदोन्नती नाकारावयाची असेल, अशा उच्चश्रेणी लघुलेखक यांनी योग्य मार्फतीने तसा अर्ज ७ (सात) दिवसांच्या आत न चुकता या कार्यालयात सादर करण्याबाबत संबंधीत उच्चश्रेणी लघुलेखक यांना सुचना द्याव्यात.

५. पदोन्नत झालेल्या उच्चश्रेणी लघुलेखक यांचे हार्दिक अभिनंदन.

प्रत कार्यवाहीसाठी,

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय,

२. सदरचे आदेश पोलीस महासंचालक यांचे संकेतस्थळावर सर्वासाठी एक महिन्याकरीता उपलब्ध करुन द्यावेत.

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२ / ३६

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता